# जैन धर्माचे मुल्याधिष्ठीत तत्वज्ञान : एक अभ्यास

टी. डी. राजगुरे
स्वा.से.श्री.क.रा.इन्नाणी महाविद्यालय, कारंजा(लाड) जि. वाशिम


## सारांश

*आधुनिक काळात मानवाने आपल्या विज्ञानाच्या जोरावर भौतिक क्षेत्रातील विविध प्रांतात नेत्रदिपक प्रगती साधल्याचे दिसून येते. यात कुठलाही संदेह नाही. प्रगती साधत असतांना मानवाने मूल्यांचा वापर करण्याऐवजी बुध्दीचा वापर केला. साध्यासाठी कोणतेही साधन बरे असो वा वाईट याची मानवाने तमा न बाळगल्यामूळे प्रगती साधल्या गेली. त्याचाच परिणम म्हणून प्रगती साधण्याकरिता मुल्यापेक्षा बुध्दीचा उपयुक्त अशी आधुनिक काळातील मानवाची धारणा बनली आणि त्याचा मुल्यांपेक्षा बुध्दीवरीलच विश्वास पक्का झाला.बुध्दीवादी युगामध्ये सामूहीक फायद्यापेक्षा स्वफायद्यावर भर दिल्या गेला. त्यामुळे मानव अहंकेद्री पर्यायाने स्वार्थी झाला. आपलाच स्वार्थ साधण्याच्या नादात ते इतराचे सूख हिरावण्यामागे लागला. त्यामुळे भौतिक प्रगतीच्या युगात मानव सुखी होण्याऐवजी दु:खी बनला. प्रथम त्याला बाह्य घटकांची भिती वाटत होती तर आधनिक काळात त्याला स्वबांधवाचीच भिती उत्पन्न झाली. मानूस मानसापासूनच असुरक्षीत झाला. परंतू जर आपण पूर्विपासून आपल्या समाजाचे व इतिहासाचे अध्ययन करायचे ठरवले तर आपल्या या हिंदूस्थानात वैदिक परंपरा जैनधर्म हे सलोख्याने नांदत असलेले आपणास दिसून येईल. यातही जैनधर्म हा वैदिक परंपरेस पर्याय असल्याने व आचारणात अत्यंत कठोरतेने आदर्श पालन करणारा असल्याने त्यातील तत्वांचा विचार परंपरादर्शक म्हणूनच करावा लागतो. अशा या जैन धर्माचा व त्यातील तत्वज्ञानाचा विचार आपण करणार आहोत.*


*मुख्य शब्द* **:** *जैन, जैनधर्म, तिर्थंकर, तत्वज्ञान, अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रम्हचर्य.*

## प्रस्तावना

प्राचीन काळापसून अगदी मानव समूहाच्या निर्मीतीपासूनच मानवाने आपल्या भल्याकरीता अनेक वेळा अनेक तत्व स्विकारली आणि पुढील पिढीकडे वारसा रूपाने हस्तांतरीत केली. पण वेळोवळी स्विकारलेली तत्वे ही तत्कालीन काळापूरतीच महत्वापूर्ण ठरली. नंतर काळाच्या ओघत ती तत्वे नष्ट झाली. त्यामूळे मानवाने अपले समाजस्वास्थ्य टिकविण्याकरीता नवनवीन तत्वे स्विकारलीत असे वळोवळी अनेक बदल घडून आलेत. अशाच प्रकारचा एक बदल इ.स. पूर्व ६ व्या शतकात घडून आला. हा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात धार्मिक दृष्ट्या बदल घडून आला.त्यामुळेच इ.स. पू. ६ व्या शतकाला धार्मिक दृष्ट्या क्रांतीचे शतक म्हणून ओळखल्या गेले. यावेळी भारतातील बिहार प्रंतात जन्माला आलेल्या वर्धमान महाविरांनी तत्कालीन धर्म तत्वज्ञानाच्या मार्गावर खडतर वाटचाल करून आपलाच आदर्श समाजापूढे निर्माण केला. आपल्या सर्व इंद्रियांवर ताबा मिळविला त्यामुळे त्यांना 'जिन' म्हटल्या गेले. पूढे त्यांना जैन धर्मातील २४ व्या तिर्थकरांचे स्थान मिळाले. त्यांनी पार्श्वनाथ या २३ व्या तिर्थकारांनी सांगितलेल्या तत्वामध्ये ब्रम्हचर्य या नविन तत्वाची भर टाकून जैन अनुयायांकरिता जी मार्गदर्शक तत्वे सांगितली त्यालाच जैन धर्मातील पंचमहाव्रते असे म्हणतात.

## अहिंसा

जैन धर्मामध्ये अहिंसा तत्वाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. काया-वाचा-मने कोणीही आपल्याकडून दुखविल्या जाणार नाहीयाची काळजी घेणे म्हणजे अहिंसा तत्वाचे पालन करणे होय. याचे अत्यंत कठोर पालन जैन धर्मात केले जाते. मनोकायावाचेनेही हिंसा होवू नये हा प्रयत्न जैन धर्मानुयायी करीत असल्याचे दिसते.

## सत्य

सत्य हे त्रिकालाबाधीत सत्य असून ते सूर्यप्रकाशा एवढे स्पष्ट असल्याने व्यक्तीने सत्यांच्या मार्गाचाच अवलंब करावा. असत्य वर्तन करू नये असे सांगितले आहे. सत्याचे पालन करीत असतांना आपल्यावर कोणतीही आपत्ती आली तरी आपण मार्गे हटता कामा नये. जर असे आपण अटल राहिलो तर आपण धर्म मार्गाने पूढे जावू शकतो.

## अस्तेय

व्यक्तीने कुणची वस्तू आपणास मिळावी अशी आशा मनात बाळगू नये दुसऱ्याच्या वस्तूंची चोरी करू नये. असे अस्तय या तत्वामध्ये सांगितले आहे.

## अपरिग्रह

अपरिग्रह म्हणजे संग्रह किंवा संचय न करणे होय. व्यक्तीने आपल्या गरजेपेक्षा अधिक वस्तुंचा संग्रह करणे म्हणजे दुःखाला आमंत्रण देणेच होय. यामुळेच जैन यतींना ओलीच भिक्षा मागावी असे त्यांनी सूचित केल्याचे दिसून येते. यामुळेच संचय वृत्ती बळावणार नाही आणि गरजवंताला आवश्यक ती वस्तू मिळेल त्यारकरीता त्याला अधिकची किंमत मोजावी लागणार नाही. पर्यायाने महागाई वाढणार नव्हती. साठेबाजीला स्थान राहणार नाही. पर्यायाने या तत्वाचे पालन केल्यास व्यक्तीचे कल्याण साधले जाईल.

## ब्रम्हचर्य

व्यक्तीने बालपणी ब्रम्हचर्य व्रताचे कठोरपणे पालन करावे आणि विवाहीत व्यक्तीने एक पत्नी व्रताचे पालन करून ब्रम्हचर्य व्रताचे कठोरपणे पालन करावे. त्या माध्यमाने आपले शरीर स्वास्थ जोपासावे याकरीता ब्रम्हचर्य व्रताला वर्धमान माहविरांनी महत्व दिल्याचे दिसून येते. वरील पंचमहाव्रंताशिवाय सम्यक दर्शक, सम्यक ज्ञान व सम्यक चरित्र हे तत्व महात्वाचे मानले. जैन धर्म तत्वज्ञानामध्ये ज्ञानापेक्षाही चरित्र्यावर भर दिल्याचे दिसून येते. वरील तत्वाचे पालन केल्यास आत्मा शुध्द होवून मुक्ती मिळते असे जैन तत्वज्ञानामध्ये सांगितल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष

१) भारतामध्ये जैन व वैदिक परंपरा सर्वात पूरातन आहे.

२) जैन धर्मामध्ये २४ तिर्थकर होवून गेलेत.

३) भगवान महाविरांनी जैन धर्मास परत प्रवाहामध्ये आणून विकास साधला.

४) भगवान महाविरांनी पंचमहाव्रते सांगितली.

## समारोप

जैन धर्मातील अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रम्हचर्य असे मुल्याधीष्ठीत तत्व पाहता त्या सर्व आदर्श संकल्पनाच असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच त्या काल आज आणि उद्याच्या व्यक्तींच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या आणि संपूर्ण जगाच्या भल्याच्या, कल्याणाच्या असल्याचेच म्हणता येते. वरील तत्वे जैन अनुयायांनीच नव्हे तर संपूर्ण जगातील तमाम धर्म, पंथाच्या स्त्री-परूषांनी एकुणच संपूर्ण मानव जातीने जैन तत्वज्ञानचा आदर्श डोळ्यापूढे ठेवून आपले वर्तन केल्यास जगाच्या वाट्याला आलेल्या व येवू घातलेल्या अनेक समस्या आपोआप संपूष्टात येईल. असा शोध निबंध सादर कर्त्याला एक आशावाद वाटतो. करीता जैन धर्म तत्वज्ञानावर प्रकाश टाकण्यासचा हा अल्पसा प्रयत्न.

## संदर्भ ग्रंथ

**भूसारी र.म., (1965).** "प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास", डॉ. व.दा. आगाशे, मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश, हैद्राबाद.

**गुप्त नथूलाल, (1993).** "भारत मे धर्म सिध्दांत और पराम्परा", चेतना प्रकाशक नागपूर

**काळे या.मा., (1924).** "वऱ्हाडचा इतिहास" , या. मा. काळे बुलढाणा.

**गुप्त नथूलाल, (1985).** "जैन - बौध्द शिक्षण पध्दती", विश्वभारती प्रकाशन नागपूर.

**पराडकर मो.दी., (1985).** "भारतातील प्राचीन विद्यापीठे", भारतीय विचार साधना पुणे.

**सहस्त्रबुध्दे प.ग., (1971).** "महाराष्ट्र संस्कृती", कॉंटीनेंटल प्रकाशन पुणे.

**पेंडसे शं.दा., (1951).** "महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास", सुविचार प्रकाशन नागपूर.